Forwarded

शैक्षणिक वर्ष २०-२१ मधील प्रवेशित द्वितीय व तृतीय वर्षाच्या विज्ञान शाखेच्या तसेच कला व वाणिज्य शाखेतील ज्या विषयांना प्रात्यक्षिके असतात अशा सर्व विद्यार्थ्यांच्या ग्रुप वर आपल्या विषयाच्या विभाग प्रमुखांनी सत्र 3/5 च्या नियमित प्रात्यक्षिकांसाठीचे वेळापत्रक टाकलेले आहे. त्या नुसार दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोज सोमवार पासून वेळापत्रकाप्रमाणे प्रात्यक्षिके आपल्या महाविद्यालयात घेतली जाणार आहेत. त्यासाठी सर्वांनी आवश्यक त्या साहित्य व सामग्रीसह महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेमध्ये हजर रहावे. त्याच बरोबर covid-19 च्या परिस्थितीचा विचार करता सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात येताना मास्क वापरणे बंधनकारक आहे. मास्क विना महाविद्यालयात विद्यार्थ्यांना येता येणार नाही याची नोंद घ्यावी.

प्र. प्राचार्य. डॉ. एच. ए. महाजन.

Forwarded

महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, वरील पत्रकानुसार आपणा सर्वांना Work from Home मंजूर करण्यात आलेले आहे. वरील पत्रकानुसार आपण सगळ्यांनी कार्यवाही करावी व तसेच केलेल्या कामाचा दररोजचा रिपोर्ट आपल्या दैनंदिनी मध्ये नियमितपणे करावा. तुम्ही घरी काय केले हे वेतन मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी विचारले तर त्यांना अहवाल देण्यास ते उपयोगी ठरेल. त्यासाठी सगळ्यांनी काळजीपूर्वक आपली कामे दैनंदिनी मध्ये नियमितपणे अंतर्भूत करावीत.

प्राचार्य व्ही. आर. पाटील

1:56 pm

Forwarded

महत्वाची सुचना -

सर्व विदयार्थ्यानां  सूचित करण्यात येते की मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या दि. 22/02/2021  रोजी प्राप्त आदेशान्वये उद्या दि .23 फेब्रुवारी2021 पासून 6 मार्च 2021 पर्यत महाविदयालयातील प्रत्यक्ष उपस्थितीत सुरू असलेले प्रात्यक्षिके  पुढील सूचने पर्यंत थांबविन्यात येत आहेत.  परंतु ऑनलाइन पद्धतीने शिकवणे (संबंधित विभागा मार्फत स्वतंत्र निर्देश मिळतील त्याप्रमाणे) सुरु राहिल. तरी पुढील सुचना येई पर्यंत कोणीही विद्यार्थ्यांनी  कॉलेजला येवु नये . -प्र.प्राचार्य डॉ. एच. ए. महाजन

1:55 pm